# पर्यावरण विषयक जन सुनावणीचे इतिवृत्त

**मे. पेनॉड रिकार्ड इंडिया प्रायव्हेट लिमिटेड गट क्रमांक ११०, ११२, १२६/१/अ, १२६/१/ब, १२६/१/ड, १२६/२/अ, १२६/२/ब, १२६/२/क, १२७/१ ते १२७/५, २०८/१, २०८/२, आणि ३६५ गांव कदावा येथे म्हाळुंगी व गांव पाडे, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिक यांच्या प्रस्तावीत सध्याच्या धान्य आधारित असवणीचा विस्तार ६० किलो ली. प्रति दिन वरून २५० किलो ली. प्रति दिन पर्यंत तसेच सह वीज निर्मिती २ मेगाव्हॅट वरून ६.५ मेगाव्हॅट पर्यंत वाढविणेबाबतचा पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत:**

---

मे. पेनॉड रिकार्ड इंडिया प्रायव्हेट लिमिटेड. गट क्रमांक ११०, ११२, १२६/१/अ, १२६/१/ब, १२६/१/ड, १२६/२/अ, १२६/२/ब, १२६/२/क, १२७/१ ते १२७/५, २०८/१, २०८/२, आणि ३६५ गांव कदावा येथे म्हाळुंगी व गांव पाडे, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिक यांच्या प्रस्तावीत सध्याच्या धान्य आधारित असवणीचा विस्तार ६० किलो ली. प्रति दिन वरून २५० किलो ली. प्रति दिन पर्यंत तसेच सह वीज निर्मिती २ मेगाव्हॅट वरून ६.५ मेगाव्हॅट पर्यंत वाढविणेबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. जिल्हाधिकारी नाशिक, ता. नाशिक, जि. नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. ०३ जुलै २०२४ रोजी दुपारी १२-०० वाजता प्रकल्प प्रवर्तकाच्या जागेमध्ये पार पडली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई - १४०/ २०२४ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २४०६१३-- एफटीएस-- ०१२२ दि. १३/०६/२०२४ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१) मा. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

(सदस्य सचिव म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, - संयोजक

नाशिक

श्री. अमर दुर्गुळे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले. मा. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. संयोजक यांनी सदर पर्यावरण विषयक सुनावणी बाबतचे महत्व तसेच याबाबत केलेल्या कार्यप्रणालीची माहिती दिली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. अमर दुर्गुळे, संयोजक यांनी असे सांगितले की म.प्र.नि. मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. पेनॉड रिकार्ड इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सध्याच्या धान्य आधारित असवणीचा विस्तार ६० किलो ली. प्रति दिन वरून २५० किलो ली. प्रति दिन पर्यंत तसेच सह वीज निर्मिती २ मेगाव्हॅट वरून ६.५ मेगाव्हॅट पर्यंत वाढविणेबाबत प्रकल्प उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदर अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांनी सदरची सुनावणी दि.०३.०७.२०२४ रोजी दु. १२.०० वाजता घेण्याबाबत निर्देशित केले.

सदर वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांनी स्थानिक वृतपत्र मराठी दैनिक "सकाळ" व दैनिक "टाइम्स ऑफ इंडीया" या इंग्रजी यात दिनांक ३१.०५.२०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण

नियंत्रण मंडळ, नाशिक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मा. जिल्हाधिकारी कार्यालय- नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, नाशिक, उप विभागीय अधिकारी, दिंडोरी, जिल्हा-नाशिक, तहसील कार्यालय, दिंडोरी, ग्रामपंचायत कार्यालय, पाडे गाव, कादवा म्हाळुंगी गाव, उमराळे खुर्द, निळवंडी पाडे, वालखेड, ओझरखेड, अवनखेड, करंजवन, निगडोळ, ता. दिंडोरी, जि. नाशिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा संयोजक, यांनी सांगितले की, उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. सदरहू सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी पर्यावरण मंत्रालय व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल.

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी सुरु करण्यात आली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबद्दल विविध मुदयांवर जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदय:स्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी बाबत सादरीकरण केले.

तद्नंतर मा. अध्यक्षांनी सदर प्रकल्पाच्या अनुषंगाणे लोकांना काही टिका टिप्पणी, निवेदण, आक्षेप किंवा त्यांचे काही पर्यावरणाच्या अनुषंगाणे म्हणने असेल ते मांडण्यास सांगितले.

सदर सुनावणी दरम्यान खालीलप्रमाणे मुददे उपस्थित करण्यात आले.

| अ.क्रं | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी | उद्योगाच्या प्रतिनिधीने दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १. | प्रकाश बाळकृष्ण शिंदे, माजी सरपंच वलखेड :-<br>१. अत्यावश्यक असल्यास २५ टक्केच कोळसा वापरणार आहात तर या कडे कोण लक्ष देणार ? | प्रकल्प अधिकारी व समन्वयक यांनी असे सांगितले की, प्रस्तावित वाढीव प्रकल्पासाठी बॉईलरची क्षमता ६० टनासाठी इतकी वाढविली जाईल. त्यासाठी नवीन टेक्नॉलॉजीचा म्हणजेच इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर चा वापर हवाप्रदूषण नियंत्रक याचा वापर करण्यात येईल. कोळसा हा फक्त निकडीच्या प्रसंगी वापरण्यात येईल किंवा मान्सून मध्ये बायोमास ची उपलबद्धता यानुसार कोळश्याचा वापर अगदी |

| | | |
|---|---|---|
| | २. प्रकल्प सध्यास्थितीत असतानाच नजिकच्या विहीरी जर तपासल्या तर विहिरी प्रदुषीत झाल्या आहेत | नगण्य करण्यात येईल, त्यामुळे हवेतील प्रदूषण हे नगण्य स्वरूपाचे राहील. त्याचा परिणाम प्रकल्पाच्या आजूबाजूला राहणाऱ्या रहिवाशांच्या आरोग्यावर होणार नाही, याची काळजी घेतली जाईल |
| | ३. मला वाटते आमच्या परिसरात हवा ही प्रदुषित असते. किती किलोमीटरवर कशाप्रकारची हवा आहे. हवेच्या प्रदुषणाबाबत चौकशी व्हावी. | प्रकल्पातून होणाऱ्या अडचणींचे तुम्ही आणि आम्ही बसूनच त्यावर तोडगा निघण्याच्या शक्यता जास्त आहे. |
| | ४. हरीत बेल्ट हा कागदावरच असतो. पर्नाड रिकार्ड कंपनीने झाडे लावली परंतू त्याची निगराणी केली का ? परंतु किती झाडे जिवंत राहिली याचा तपशिल नाही. | आपण उल्लेखलेल्या सी. एस. आर. तील १३२ लाख रूपये फक्त प्रकल्प प्रोसेस असतो तत्पुरताच मर्यादित आहे. सदर रक्कम प्रकल्प चालू असतांनाच खर्च करण्याची निकश आहे. त्यासाठी वेगळ बजेट केल जातं आणि सदर रक्कम गरजेनुसार व अधिकाऱ्यांच्या सल्यानुसारच खर्च केली जाते. |
| | ५. सी. एस. आर चा कश्या प्रकारे उपयोग केला याची चौकशी केली पाहिजे. | आपण सांगितल्या प्रमाणे आजूबाजूच्या शेतक-यांच्या विहिरीच्या पाण्याचे नमुने तसेच हवेची तपासणी करण्यात येईल. |
| | ६. एन. जी. ओ. च्या माध्यमातून जनतेचा पैसा लुटला जात आहे. असा माझा आरोप आहे. | |
| | ७. पर्यावरणाच्या दृष्टीने १३२ लाख रूपये हे त्यात काहीही होणार नाही त्यामध्ये १०-१२ आमचे खेडे आहेत ती रक्कम सुद्धा या प्रकल्पात वाढली पाहिजे. आणि स्थानिक परिसरातील ज्या १०-१२ ग्रामपंचयाती आहेत त्यांचे सरपंच त्यांचे सदस्य यांना विश्वासातघेऊन आमच्या आरोग्याच्या दृष्टीने आपण काम केले पाहिजे. | |
| | ८. आपल्या कंपनीमुळे माश्या व मच्छर यांचे प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. | |
| | ९. आजूबाजूच्या १०० शेतक-यांच्या विहिरीच्या पाण्याचे नमुन्याची तपासणी करावी. आजूबाजूच्या हवेची तपासणी करावी त्याचा | |

| | | |
|---|---|---|
| | अहवाल आधी या समीती समोर ठेवावा त्या नंतर सांगा की प्रदुषण होत नाही<br>१०. या कंपनीच्या बॉयलरच्या चिमणी मुळे वातावरणात बदल होतो आणि पर्जन्य सुद्धा विस्कळीत होत हे ही आमच्या निदर्षणात आले आहे.<br>११. जलसंधरणाची कामे चांगली केली पाहिजे. | |
| २. | शरद एकनाथ मालसाणे मु.पो. निगडोळे :<br><br>सदर प्रकल्पाचे ०.७५ टक्के म्हणजेच १३२ लाख रूपये त्याचा उपयोग आपण पर्यावरण किंवा सामाजिक कामकाजाकरीता उपयोग करणार आहोत तर त्यातून एकळगाव, तळेगाव या गावांना शाळेसाठी बिल्डींग दिल्या तर तेथील आदिवासी विद्यार्थ्यासाठी निश्चितच चांगले होईल. | प्रकल्प अधिकारी यांनी असे सांगितले की, आपण सांगितलेली बाबची आम्ही नोंद करत आहोत. कंपनीच्या बजेट नुसार आम्ही निश्चितच याचा प्राधान्याने विचार करू, सी. एस. आर. चा फायदा आपल्या भौगोलिक क्षेत्रातील लोकांनाच व्हावा हिच आमची भुमिका आहे. |
| ३. | वामन पाटील वलखेड पोलीस पाटील वलखेड :-<br><br>कंपनीच्या गाड्या येतात त्यासाठी पार्कीगची व्यवस्था नाही. गाड्यामुळे बऱ्याच वेळा वाहतुक कोंडी होते. तसेच त्यातुन प्रदुषण होते. चारपट प्रोजेक्ट वाढल्या नंतर आजूबाजूचे रस्ते खराब होतील तर सदर रस्त्यांचे कंपनीच्या प्रोजेक्टसाठी वाहनांची व्यवस्था करावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी असे सांगितले की, प्रकल्प/कंपनीसाठी येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांसाठी कंपनीने या अगोदरच पार्कीगची व्यवस्था करण्यास सुरवात केलेली आहे. त्यामध्ये सर्व सोयीसुविधांची व्यवस्था केली जाईल. तसेच रस्त्याची व्यवस्था सुध्दा उत्कृष्ट प्रतिची केलेली आहे. तसेच संबंधीत रस्ते बनविणे व त्याची दुरूस्ती करणे हे शासनाचे काम असले तरी देखील कंपनीने शासनाच्या निधीची वाट न पाहता स्वतः खर्च करून यापूर्वी रस्ते चांगले केले आहेत. तसेच संबंधीत रस्ते हे पूर्णतः १०० टक्के चांगले केले जातील. |
| ४. | श्री. विनायक रामदास शिंदे, सरपंच वलखेड<br><br>१ प्रकल्पात उत्पादन सुरू असतांना सांडपाणी बाहेर पडते आणि त्यामुळे जमिनीचा पोत/कस खराब होतो आणि त्यामुळे जमिनीतून पिके | प्रकल्प प्रवर्तक यांनी असे सांगितले की,<br><br>१. प्रस्तावित वाढीव प्रकल्पासाठी बॉईलरची क्षमता ६० टनासाठी इतकी वाढविली जाईल. त्यासाठी नवीन टेक्नॉलॉजीचा म्हणजेच इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर |

| | | |
|---|---|---|
| | उत्पादन क्षमता कमी होते, तसेच राखसुध्दा बाहेर पडते व ती राख आजूबाजूच्या शेतातील पिकांवर येवुन पिके खराब होतात, त्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे ? | चा वापर हवाप्रदूषण नियंत्रक याचा वापर करण्यात येईल.<br>कंपनीने यापूर्वी व्यवसाईक सामाजिक जबाबदारी अंतर्गत २० ते २२ कोटी रूपये खर्च केले आहेत. ही सर्व कामे करण्यासाठी भारत सरकारने एन.जी.ओ. या संस्थेची स्थापना केली आहे. ही सर्व कामे एन.जी.ओ. हया संस्थेमार्फत व त्यांच्या नियमावलीत राहून केली जातात. संबंधीत कामे ही स्थानिक गावक-यांशी चर्चा करून व त्या उपाय शोधून करावयाची आहेत. एन.जी.ओ. मार्फत कामे करतांना त्या कामात पारदर्शकपणा कसा आणता येईल, हयाचा विचार केला जाईल. |
| | २ अलिकडीच्या चार वर्षात कंपनीमार्फत केली जाणारी कामे चांगल्या प्रकारे केली जात नाहीत तसेच कंपनीत काम करीत असलेले स्थानिक लोकांना नोकरीत कायमस्वरूपी करण्यात येईल काय? | २. कंपनीमार्फत आजूबाजूच्या व स्थानिक लोकांशी विचारविनियम करून तोडगा काढला जाईल. तसेच स्थानिक कर्मचाऱ्यांना नोकरीत कायम करण्याविषयी कंपनीच्या नियमावलीत व कंपनी कायदा, २०१३ मधील तरतुदी नुसार योग्य तो तोडगा काढला जाईल. |
| ५. | **श्री. प्रकाश बाळकृष्ण शिंदे, माजी सरपंच मौजे वलखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक.**<br>कंपनी काही कामे एन.जी.ओ. या संस्थेमार्फत करून घेते, ती कामे बरोबर होत नाहीत. त्यासाठी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांना न बोलावता व त्यांना विश्वासात न घेता एन.जी.ओ. परस्पर निकृष्ठ दर्जाची कामे करतात, त्यावर कंपनीचे संचालक म्हणून तुम्ही काय उपाययोजना करणार ? | प्रकल्प प्रवर्तक यांनी असे सांगितले की,<br>कंपनीने एन.जी.ओ. मार्फत कामे करून घेतली आहेत. कंपनीने वेगवेगळे प्रकल्प राबविले आहेत. त्यासाठी कंपनीने २२.०८ कोटी रूपये खर्च केले आहेत. पुढील कामे करतांना एन.जी. ओ. ऐवजी स्थानिक गावकऱ्यांना विश्वासात घेऊन चांगल्याप्रकारे कामे केली जातील. |

| | | |
|---|---|---|
| ६. | **श्री. सुजीत पाटील, रा. मौजे वलखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक.**<br><br>कंपनीमार्फत आज रोजी होणाऱ्या प्रकल्प विस्तारीकरणाबाबतची जाहीर लोक सुनावणीची कोणत्या प्रकारची जाहीरात, नोटीस व तत्सम माहिती गावकऱ्यांना देण्यात आलेली नाही, तसेच भुजल सर्वेक्षण तसेच पर्यावरण सर्वेक्षण करण्यासाठी कोण अधिकारी आले हे आम्हाला माहिती नाही. त्यामुळे कंपनीवर किती विश्वास ठेवायचा ? | श्री. अमर दुर्गुळे यांनी आयोजक यांनी सदर प्रकल्पाच्या पर्यावरण जाहिर सुनावणीच्या अनुषंगाने जाहिरात हि स्थानिक वृत्तपत्रात एक महिण्यापुर्वी प्रसिद्ध केलेली होती तसेच प्रकल्पाचा पर्यावरण विषयक अहवाल हा जिल्हाधिकारी कार्यालय, प्रांत कार्यालय, दिंडोरी, तसेच आजूबाजूच्या परिसरातील ग्रामपंचायतीमध्ये लोकांना अभ्यासनासाठी तसेच त्यांचे म्हणने लेखी स्वरूपात देण्यासाठी सुद्धा आवाहन केले होते तसेच सदर प्रस्तावीत प्रकल्पाची जाहिरात हि ग्रामपंचायतीमध्ये लावण्यात आली होती.<br><br>प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी असे सांगितले की, सर्वेक्षणाबाबत हवेतील नमुन्यांचे निवडलेल्या ठिकाणी निरीक्षण केले गेले आहे, तसेच इतर पर्यावरणीय घटकांचे देखील निवडक ठिकाणी प्रभाव क्षेत्रामध्ये अध्ययन करण्यात आले तसेच उपग्रहाद्वारे मिळालेल्या छाया चिंत्रांद्वारे देखील परिसरातील इतर घटकांचा अभ्यास केला गेला याबाबतचे फोटोग्राफ्स् उपलब्ध आहेत. |
| ७. | श्री. हिरामण दिलीप पाटील<br><br>मी कंपनीपासून ७०० ते ८०० मीटर अंतरावर राहातो व तेथे माझी शेती आहे, मला व आजूबाजूच्या शेतकऱ्यांना कंपनीच्या विस्तारीत प्रकल्पाची माहिती नाही ? | श्री. अमर दुर्गुळे यांनी आयोजक यांनी सदर प्रकल्पाच्या पर्यावरण जाहिर सुनावणीच्या अनुषंगाने जाहिरात हि स्थानिक वृत्तपत्रात एक महिण्यापुर्वी प्रसिद्ध केलेली होती तसेच प्रकल्पाचा पर्यावरण विषयक अहवाल हा जिल्हाधिकारी कार्यालय, प्रांत कार्यालय, दिंडोरी, तसेच आजूबाजूच्या परिसरातील ग्रामपंचायतीमध्ये लोकांना अभ्यासनासाठी तसेच त्यांचे म्हणने लेखी स्वरूपात देण्यासाठी सुद्धा आवाहन केले होते तसेच सदर प्रस्तावीत प्रकल्पाची जाहिरात हि ग्रामपंचायतीमध्ये लावण्यात आली होती. |
| ८. | श्री. संजय बाजीराव पाटील.<br><br>विस्तारीत प्रकल्पासाठी कंपनीमार्फत नवीन मोठी चिमणी बसवली जाणार आहे तर त्यापासून होणाऱ्या वायू/धुली प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या द्राक्षे बागांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांनी कोणती उपाययोजना केली आहे? | याबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी कंपनी योग्य ती काळजी घेईल. बॉईलरला अद्यावत हवा प्रदुषण नियंत्रण संयत्रणा बसविण्यात येणार आहे. सध्याच्या बॉईलरला सुद्धा ई.एस.पी. हि हवा प्रदुषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात आलेली आहे. चिमणीतून निघणाऱ्या प्रदुषकांची ऑनलाईन नोंद ठेवली जाते. प्रस्तावीत प्रकल्पातून जे काही दुषित पाणी निघणार आहे, त्यावर योग्य ती प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया सयंत्रणा उभारली जाईल व ते पाणी पुन्हा वापरात आणले जाईल. धुलीकण हे रस्त्यावरून |

| | | |
|---|---|---|
| | | जाणाऱ्या वाहनांमुळे होण्याची शक्यता आहे. प्रस्तावित प्रकल्पातून कोणत्याही प्रकारचे हवेचे प्रदूषण होणार नाही यांची काळजी कंपनीचे व्यवस्थापन घेईल |
| ९. | **श्री. नरेंद्र कोंडाजीराव जाधव, सरपंच आवनखेड**<br>सदरील कंपनी हया ठिकाणी अनेक वर्षापासून स्थापन झालेली आहे. तसेच कंपनीने या अगोदर चांगली कामे केली आहेत. स्थानिक विद्यार्थ्यांसाठी चांगली कामे केली आहेत. कंपनीच्या विस्तारीत प्रकल्पापासून स्थानिक गावकऱ्यांना व पर्यावरणाला काही त्रास व अडचणी नव्याने निर्माण होत असतील तर शासन आणि मा. अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना विनंती आहे की, त्यांनी त्या अडचणी विचारात घेवुन प्रकल्प विस्तारीत करावा. विस्तारीत प्रकल्पास आमचा विरोध नाही. परंतु कंपनीने विस्तारीत प्रकल्प राबवितांना महाराष्ट प्रदूषण मंडळाच्या निर्देशाप्रमाणे व नियमावरीलप्रमाणे कामे करून प्रकल्प विस्तारीत करावा. कंपनीमार्फत वैद्यकीय सुविधा चांगल्याप्रकारे दिल्या जात आहेत. गोरगरीब लोकांना कंपनीतर्फे चालविण्यात येणाऱ्या दवाखान्याचा/हॉस्पिटलचा लाभ दिला जात होता. ते हॉस्पिटल हे फक्त तीन वर्षाकरीता होते. कंपनी त्या हॉस्पिटलची कायमस्वरूपी व्यवस्था करून द्यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी असे सांगितले की, हॉस्पिटल सुविधांचा गांवातील लोकांना फायदा झाला हयाचा कंपनीला अभिमान आहे. तसेच कंपनीतर्फे रूग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. त्या सुविधा आम्ही कधीही बंद करणार नहीत आणि त्या भविष्यात सुध्दा चालू राहतील हयाची हमी देतो, असे सांगितले. |
| १०. | **श्री. रघुनाथ पाटील, माजी सरपंच वलखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक.** | प्रकल्प प्रवर्तक यांनी असे नमुद केले की, आपल्या सर्व सुचनांचा विचार करून त्या राबविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे सांगितले. |

| | | |
|---|---|---|
| | यापूर्वी बऱ्याचशा नागरीकांनी सुचना मांडल्या आहेत. त्या सर्व सुचनांना मी अनुमोदन देतो. आम्ही परिसरातील सर्व नागरिक शेतकरी आहेत. कंपनीने 'जगा आणि जगू द्या' या माध्यमातून प्रकल्प राबवावा. प्रकल्पाला आमचा विरोध नाही. पर्यावरण मंडळाच्या अटी व शर्तींना अधीना राहून विस्तारीत प्रकल्प राबवावा. सद्याच्या प्रकल्पाकडून होणाऱ्या कामांमुळे परिसरातील द्राक्षेबागांना फटका बसला आहे. कंपनीने परिसरात शिक्षणासाठी व परिसर हरीत करण्यासाठी चांगली कामे केली आहे. पर्यावरणाबाबत परिसरातील रस्त्यांच्या दोन्ही बाजूला झाले लावण्यात यावीत. शैक्षणिक, सांस्कृतिक व इता कामांसाठी सुविधा पुढे चांगल्या प्रकारे राबविण्यात याव्यात. परिसरातील कामे करण्यासाठी प्रकल्पानुसार जो निधी उपलब्ध करून दिला जातो त्याचा वापर एन.जी.ओ. मार्फत करण्यात येऊ नये तो निधी स्थानिकांमार्फत कामे करून वापरण्यात यावा. कंपनीने यापूर्वी केलेली कामे उंकृष्ट दर्जाची आहेत मात्र एन.जी.ओ.मार्फत केलेली कामे निकृष्ट दर्जाची आहेत.<br><br>परिसरातील कर्मचारी कंपनीत कामासाठी येतात. त्यांचे अपघात होतात. त्यांना कंपनीने हेल्मेट वापर सक्तीचा करावा, त्यामुळे एखाद्या कर्मचाऱ्याचा अपघात झाल्यास त्याचा प्राण वाचू शकेल.<br><br>कंपनी काही कर्मचारी गेल्या चार-पाच वर्षापसून नोकरीस आहेत. त्यांना नोकरीत | |

| | | |
|---|---|---|
| | कायम करण्यात यावे. तसेच विस्तारीत प्रकल्पामध्ये नोकरीसाठी स्थानिक शिक्षीत व सुशिक्षित बेरोजगार तरूणांना प्राधान्य देण्यात यावे. | |
| ११. | श्री. रविंद्र विठ्ठल मोरे, माजी सरपंच करंजवण.<br>१. कंपनीने पूर्वी मोठया प्रमाणात सुखसुविधा पुरविल्या आहेत. पर्यावरण व सांडपाणी यासाठी चांगली कामे केली आहेत. तसेच शैक्षणित क्षेत्रात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी चांगली कामे केली आहेत. तसेच हुशार व गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशिप/शिष्यवृत्ती दिली जावी आणि त्याबाबत विचार व्हावा.<br>२. विस्तारीत प्रकल्प राबवितांना स्थानिक बेरोजगार युवकांना प्राधान्य दिले जाईल काय ? | प्रकल्प प्रवर्तक यांनी असे नमुद केले की, या बाबत विचार केला जाईल.<br><br>प्रकल्प प्रवर्तक यांनी असे सांगितले की, स्थानिकांना प्राधान्य दिले जाईल. |
| १२. | **श्री. निलेश विठोबा पेलमाले**<br>पाण्याची व्यवस्था नीट करावी. तसेच सुनिता गोविंदराव महाले यांचे विहिरीला दुषित पाणी येते, त्याबाबत विचार करावा. परिसरात काही प्रलंबीत कामे आहेत, ती कामे करण्यात यावीत. | या बाबत उप-प्रादेशिक अधिकारी यांनी संबंधीत जागेची पाहणी करूण योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे नमुद केले.<br>तर प्रकल्प प्रवर्तकाने संबंधीत प्रलंबित कामे पुर्ण केली जातील असे सांगितले |
| १३. | पत्रकार श्री. संतोष करतार<br>शैक्षणिक क्षेत्रात काही स्पर्धा परिक्षा व इतर उपक्रम चालू केले होते ते पुढेही चालू ठेवावेत. एन.जी.ओ. संस्था ही गुजरात राज्यातील संस्था आहे. एन.जी.ओ. ही संस्था लोकांपर्यंत सर्व सुविधा व्यवस्थितरित्या पोहचवित नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सर्व सुचना मान्य करून प्रकल्प विस्तारीत करतांना त्यांचा विचार केला जाईल व त्या सुचनांचा प्रकल्प विस्तार पुस्तिकेत करण्यात यावा तसेच आणखी काही मुद्दे असतील तर त्यांच देखील विचार केला जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | अहवालात दुषित पाणी संबंधाने ज्या महिलेच्या शेतातील विहीरमध्ये दुषित पाणी येते त्या संबंधानो विचार व्हावा. | |

सदर जाहीर लोक सुनावणीचे संयोजक यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही. तसेच या कार्यालयाकडे लेखीस्वरूपात कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. त्यांनी पुढे नमुद केले की, सदर जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने पुढे पर्यावरण मंत्रालय व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल.

सदर सुनावणी दरम्यण एकुण ५ लेखी अर्ज प्राप्त झालेली आहेत.

उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांच्या संमतीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (अमर दुर्गुळे) | (लिंबाजी सु. भड) | (जलज शर्मा भाप्रसे) |
| संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी | सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी | अध्यक्ष तथा |
| म.प्र.नि मंडळ, नाशिक | म.प्र.नि. मंडळ, नाशिक | मा. जिल्हाधिकारी, |
| | | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक |